# विनोबा-वार्ता

दैनिक साम्ययोग

मासिक वर्गणी १.५० पैसे    किरकोळ अंक १० पैसे

अंकः २०५-२०६) बुध-गुरुवार ता. २-३-१२-१९६४

## विनोबांचे स्वास्थ्य

विनोबाचे आरोग्य साधारणपणे ठीक आहे. त्यांना डॉक्टरांकडून औषधोपचार व इंजेक्शन्स चालू आहेत. दोन तीन दिवसाआड त्यांना चक्कर येत असतात. परंतु चिंता करण्याचे कारण दिसत नाही. गेल्या पाचसात दिवसापासून आपल्या कुटीसमोरील झाडाखालीच दिवसाचे बारा तास ते घालवितात. तेथेच येणाऱ्या जाणाऱ्या सोबत त्यांच्या लिखित मुलाखती चालतात.

# भारताच्या तटस्थतेच्या नीतीला विश्व-श्रेष्ठ राजनीतिज्ञांची मानवंदना

आणि

# भारताच्या धर्म-निरपेक्षतेवर विश्व धर्म-गुरूं कडून शिक्कामोर्तब

## बोधिवृक्षाची फांदी व्हॅटिकनला पोहोचली

–वसंत बोंबटकर

### विकासाचे सूत्र गवसले

मुंबईला युकॅरिस्टिक कॉंग्रेसचे आणि सारनाथयेथे विश्वबौद्ध संमेलनाचे जे अधिवेशन चाललेले आहे त्याचे आम्ही प्रेमादराने स्वागत करीत आहोत.. भारताला आतिथ्याचा हा जो बहुमान ह्या दोन्ही संघटनांनी देऊन भारताचा गौरव केला त्याबद्दल भारताला अभिमान वाटत आहे. रशिया व अमेरिका ह्या दोन गटांच्या म्होरक्यांनी भारताने पुरस्कारिलेल्या गटनिरपेक्ष तटस्थतेच्या धोरणाचा नुकताच गौरव करून, सीमासंकटाच्या वेळी प्रत्यक्ष मदत करून, त्या धोरणाबाबत आपली सहमति व्यक्त केली व त्या धोरणाला एकप्रकारे मानवंदना दिली. ही एक फार ऐतिहासिक महत्वाची घटना घडली. नवोदित आशिया, आफ्रिका खंडातील राष्ट्रांना तर अलिप्ततेच्या धोरणामुळें आपल्या विकासाचे सूत्रच सापडले.

### दोन विश्वधर्मगुरूंची मान्यता

आता ख्रिश्चन आणि बौद्ध धर्माची ही दोन विश्वसंमेलने भारतात होत आहेत हीहि एक ऐतिहासिक महत्वाची घटना आहे. भारताच्या सेक्युलर स्टेटच्या धोरणावर, किंवा भारताचे उपराष्ट्रपति म्हणतात त्याप्रमाणे राष्ट्रपिता गांधीजी ह्यांनी पुरस्कारिलेल्या सर्वधर्मसमभावाच्या धोरणावर, विश्वधर्मगुरूंनी केलेले हे शिक्कामोर्तबच आहे.

### ईश्वराने पाठविलेले श्रेष्ठ नट

भारतीय संस्कृति ही समन्वय संस्कृति आहे. भारतात आतापर्यंत आत्मज्ञानाची व विज्ञानाची सातत्याने व नम्रतेनें जी शतकानुशतके तपश्चर्या चालली, उपासना चालली त्याचेच हे फलित आहे. त्यामुळेच नाना भाषा, नाना धर्म व भिन्न भिन्न चालीरीति असलेले लोक भारत पुरुषाच्या शरीराचे अवयव बनून नांदत आहेत. जगात अन्यत्र हे दर्शन घडत नाही. तेव्हा भारत हे केवळ राष्ट्रच नाही तर आंतरराष्ट्रीय राष्ट्र आहे. उद्याच्या One world (एक जग) ची रंगीत तालीम भारताच्या रंगभूमिवर खेळली जात आहे.

ह्या विश्वात सबंध मानवजात एकाच निशाणाखाली येणार असल्याची चाललेली पूर्वतयारी लवकर पूर्ण करण्यासाठी ईश्वराने रामकृष्णपरमहंस–विवेकानंद, योगी अरविंद-माताजी, टागोर–मानवेंद्ररॉय, ॲनीबेझंट-ॲंड्र्यूज, गांधी–गफारखान, जवाहरलाल— विनोबा, कृष्णमूर्ति-दलाई लामा ह्यासारखे लोकोत्तर नट पाठविले आहेत.

### सत्य–अहिंसेचा निर्धार

भारत स्वतःला सेक्युलर स्टेट म्हणवतो. तो नकारात्मक शब्द सोडल्यास व त्याचा भाव ध्यानात घेतल्यास भारताला सत्य व अहिंसा ह्या नैतिक व आध्यात्मिक मूल्यांवर समाजाची उभारणी करायची आहे. म्हणूनच 'सत्यमेव जयते' हे आम्ही आमचे बोध वाक्य बनविले आहे; आणि अहिंसक पुरुषार्थाचे चिन्ह म्हणून अशोकचक्राची राष्ट्रमुद्रेच्या जागी प्रतिष्ठापना केली आहे.

### कबिराने शेला विणला

एखाद्या विशाल नदीला फाटे फुटावे त्याप्रमाणे हिंदु दर्शनाच्या ह्या गंगा–नदीला: बौद्ध, शीख, जैन आदि धर्मांचे फाटे फुटले आहेत. त्यानंतर दोन हजार वर्षांपूर्वी ख्रिश्चन संस्कृतीची व आठशे वर्षांपूर्वी स्वतंत्र अशा मुस्लिम संस्कृतीची धारा भारतात प्रवाहित झाली. ह्यावेळी मूळ भारतीय संस्कृतीच्या उपासकत संकुचित जातीय भाव, परस्पर द्वेष ह्यांची रणें माजल्यामुळें द्रवीड–आर्य, शक–हूण ह्यांचा जसा मधुर संगम भारतात पूर्वी झाला तसे, ह्यावेळी न घडता, एक स्वतंत्र प्रवाहच त्यांचा बनला. गुरुनानक, कबीरादींनी ह्या निरनिराळ्या धाग्यांचे सणंग विणण्याचा पुन्हा प्रयत्न केला. परंतु इंग्रजांच्या राज्यतृष्णेमुळे ह्या सणंगाला आपसातील दंग्यांची कात्री लागली. गांधीजींनी आपल्या हाडाची सुई करून प्रेमाच्या धाग्याने हे फाटलेले सणंग सांधण्याचा प्रयत्न केला. पण उभयविध गटातील दुराग्रही, एकांतिक विचाराच्या लोकांनी त्यात अडथळे आणले. परंतु गांधीजींचे प्रयत्न व्यर्थ गेले नाहीत. ह्या सणंगाची आणखी होणारी चीरफाड त्यामुळे थांबली. पण भारताचे दोन तुकडे पडले.

भारताचे दोन तुकडे पडले असे म्हणण्यापेक्षा भारतीय संस्कृतीचे तीन तुकडे पडले असे म्हणणे अधिक वास्तविक होईल. आज पूर्व पाकिस्तानात (बंगाल) जी संस्कृति नांदत आहे ती पाकिस्तानच्या कपोलकल्पित संस्कृतिपेक्षा फार भिन्न आहे तिचा तोंडावळा भारतीयच आहे. तेव्हा कालांतराने भारत पुन्हा अेकसंध होणे किंवा पाकिस्तान, भारत, ब्रम्हदेश, सिलोन, नेपाळ इत्यादि चे अेक 'राष्ट्र कुटुंब' बनणें सुद्धा अशक्य नाही.

### कडी जोडणारे दार्शनिक

दोन हजार वर्षांपासून ख्रिश्चन धर्माचा भारताशी संबंध आहे. विवेकानंदांनी त्यांना आपल्याकडें आकर्षिले आहे; गांधीजींनी आफ्रिकेत त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम केले आहे; जवाहरलालजींनी राष्ट्रकुलाच्या रुपाने ते रोपटे जोपासले आहे आणि रवींद्रनाथांच्या प्रतिभेचे पाणी ते प्याले आहे. अरविंद, कृष्णमूर्ति, विनोबा ह्यांनी ख्रिश्चन समाजाच्या अंतःकरणात प्रवेश केला आहे. तेव्हा ख्रिश्चन समाजाचेहि जवळचे संबंध निर्माण होतील अशी आशा आहे. गोवा व नागभूमि वर तो प्रयोग चालू झाला आहे.

### सामान्य जनता उमगली

राजनैतिक शक्ति किंवा पांथिक धर्म शक्ति आमच्याच धर्मात किंवा राजनैतिक विचारसरणीत जगाला उद्धरण्याची अेकमेव शक्ति आहे असे कितीहि घसा कोरडा करून सांगोत, जगाला आता विज्ञानाने जवळ आणले आहे.

### ईश्वरालाच आम्हाला एकत्र आणायचे आहे

नाईल, इतकीच, गंगा, वोल्गा, थेम्स मिसिसिपी या नद्यांची माती सुपीक व पवित्र आहे. आणि अमेरिकेचा गहू रशियाला पचतो व भारताचे काजू अमेरिकेला आवडतात हे सिद्ध झाले आहे. अेकाच विश्वविद्यालयात जगातील सर्व ठिकाणचे लोक विशिष्ट ज्ञान सारख्याच तत्परतेने ग्रहण करू शकतात हे सिद्ध झाले आहे. जगातील सर्व ठिकाणचे लोक विशिष्ट ज्ञान सारख्याच तत्परतेने ग्रहण करू शकतात हे सिद्ध झाले आहे. तसेच जगातील सर्व आध्यात्मिक विचारधारांचे मूळ हि अेकच आहे हे लोकांच्या ध्यानात आले आहे. त्यामुळेच गांधीला ख्रिश्चन लोक ख्रिस्ताचा अवतार मानतात,

( पान ४ वर )

www.vinoba.in

# 'विनोबा वार्ता' दैनिक साम्ययोग ४ डिसेंबर पासून साप्ताहिकात विलीन होणार

विनोबांचे महाराष्ट्रात ३ मार्चला आगमन झाले. त्या निमित्ताने ५ मार्च पासून 'विनोबा वार्ता' दैनिक चालू झाले. मागील नऊ महिन्यापासून विनो-बांची प्रवचने निरंतर छापून दूरदूरच्या खेड्यापाड्यात पोहोचविण्याचे काम ह्या वार्तेने केले. त्यामुळे विनोबा शरीराने दूर असूनहि ते आपल्यासमोर बसून आपल्याशी हितगुज करीत आहेत असे वाटायचे.

मध्यंतरी विनोबांची पदयात्रा त्यांच्या मुदती तापामुळे स्थगित झाली. आणि गेलेली शक्ति परत मिळवायला तापातून बरे झाल्यानंतर त्यांनी मौन घेतले. त्यामुळे 'विनोबा वार्ता' वार्ता ती कांय देणार ?

पुन्हा त्यांची पदयात्रा ४ नोव्हेंबरला चालू झाली. ता. ११ नोव्हेंबरची त्यांची पदयात्रा डोक्यात चक्कर चालू असतांना, जयविजय च्या हातावर शरीराचा भार टाकूनच झाली आणि १३ ला तर दोन तास ते मूर्च्छित पडल्यासारखे झाल्यामुळे पदयात्रा करणे अशक्यच झाले. आता विनोबांची पदयात्रा व प्रवचने बंद आहेत. त्यामुळे वार्तेचे मूळ प्रयोजन संपले आहे. नऊ महिने चाललेल्या ह्या वार्तेसाठी आम्हाला, पाच सात हजार रुपये तोटाहि सहन करावा लागला. अधिक तोटा करवून घेणे हे सुद्धा आमच्या शक्तीबाहेरचे ठरले असते. ह्या उभयविध कारणांमुळे ता. ४ डिसेंबर पासून 'विनोबा वार्ता' बंद करावी लागत आहे, ह्याबद्दल आम्हाला मनस्वी खेद वाटतो.

'विनोबा वार्ता' म्हणजे 'सर्वोदय वार्ता' असा विनोबांचा अभिप्राय आहे. 'साप्ताहिक साम्ययोग' हे काम मागील अकरा वर्षापासून बजावीतच आहे. तेव्हा आज जे 'विनोबा वार्ते'चे ग्राहक असतील, त्यांची जी वर्गणी शिल्लक असेल त्या वर्गणीच्या मोबदल्यात त्यांना साप्ता-हिकाचे अंक मिळतील. ज्यांना साप्ताहिक साम्ययोग नको असेल व वर्गणीचे पैसे परत हवे असतील त्यांना ती रक्कम आम्ही, त्यांची सूचना मिळताच, मनी-ऑर्डरने पाठवू.

ह्याबाबत आपल्याला जो त्रास झाला त्याबाबत आम्ही आपली क्षमा मागतो. ह्या धावपळीत आमची व्यवस्थाहि आम्ही नीट ठेऊ शकलो नाही, त्यामुळेहि वाचकांना फार त्रास झाला ह्याची आम्हाला जाणीव आहे. विनोबांबाबत, सर्वोदय विचाराबाबत आपल्या मनात वसत असलेल्या प्रेमामुळेच आपण हे सर्व सहन केले.

साप्ताहिक व दैनिक वक्तशीर छापून देण्याइतक्या समर्थ प्रेसशी शेवटपर्यंत आमची गाठ पडली नाही. त्यामुळेहि अंकांत बराचसा अनियमितपणा आला. तरीहि सेवाग्रामचे नईतालीम मुद्रणालय व वर्धा येथील भास्कर प्रेस ह्यांनी त्यांच्या शक्तिनुसार आमच्या प्रेमाग्रहाला वश होऊन अंक काढण्याबाबत जी मेहनत घेतली त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

सर्व श्री. आबासाहेब काळे, हरिहरराव देशपांडे, वामनराव पाचपांडे, ज्ञानदेव कदम, रमाकांत पाटील, य. भा. जोशी ह्यांनी संपादनाच्या कामांत वेळोवेळी केलेल्या मदतीबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. श्रीमती कालिंदी-ताई ह्यांनी पाठविलेल्या प्रवचनांच्या रिपोर्टमुळे आमच्या कामाला बहुमोल सहाय्य झाले. त्यांची ही 'वार्ता' ऋणी आहे.

आम्ही आमच्या वाचक बंधूंना पुन्हा विनंति करीत आहोत कीं 'विनोबा वार्ता' ही बंद होत नसून ती साम्ययोग साप्ता-हिकात विलीन होत आहे. तेव्हा त्यांनी साम्ययोग साप्ताहिकाचा प्रसार करण्यास मदत करावी.

आमच्या एजंट बंधूनाहि हीच विनंति आहे कीं त्यांनीहि 'दैनिक वार्ते'प्रमाणेच साप्ताहिक साम्ययोगाचेहि अंक खपवावेत.

विनीत

**वसंत बोंबटकर**

---०---

## साप्ताहिक डायरी

ब्रह्म-विद्या-मंदिर
पवनार

१६ तारखेला मद्रासचे कर्णतज्ञ डॉ० सत्यनारायण व पुण्याचे कर्णतज्ञ डॉ० आपटे बाबांच्या कानाची तपासणी करण्याकरितां आले. संपूर्ण तपासणी झाल्यानंतर त्यांनी काही औषधोपचार सुचविला. बाबांनी तो मान्य केला. आता डॉक्टरांच्या सल्याप्रमाणेच उपचार चालू आहेत.

१७-११-६४

सकाळी डॉक्टर महोदय आले व बाबांच्या समोर उभे राहून त्यांनी बांबाना इंजेक्शनाची सुई दाखविली. बाबा हसू लागले व उठून बसून लिहून दिले, 'इंजेक्शन म्हटले की डॉक्टर खुष'. मग आश्रमवासीयांकडे वळून म्हणाले, "डॉक्टर टोचेने आज आपले काम उरकून घेतले." डॉ० टोचे म्हणजे डॉ० महोदय ! ते बाबांना इंजेक्शनाची सुई टोचतात. डॉक्टर म्हणाले की माझ्या सुई टोचण्याच्या कामाबद्दल मला ही उपाधि बहाल केली आहे.—डॉ० टोचे ! तेव्हा बाबांनी या नवीन नावाचा आम्हास परिचय करून दिला.

दुपारी काही कार्यकर्ते भेटायला आले होते. त्यांना लिहून दिले, "ग्रामदा-नाची कल्पना लोकमान्य आहे. मानखेडचे ग्रामदान झाले. अशा ग्रामदानी गावांत खादी कार्यकर्त्यांनी तात्काळ पोचले पाहिजे. सध्या कापसाचा हंगाम चालू आहे. मागाहून गेल्यास 'बैल गेला आणि झोंपा केला' अशी स्थिति व्हाव-याची. गावचे लोक मागणी करतील व मग आम्ही जाऊ हे धोरण बरोबर नाही."

इंदूरहून श्री. पुजारीरामजी भेटाव-यास आले होते. ते इंदूरच्या विश्रम-आश्रमांत राहतात व तेथील सर्वोदय पात्रांची व्यवस्था पाहतात. दोन, चार वर्षांनंतर चार दिवस जरी बाबांच्या सान्निध्यात राहिले तरी त्यांना जीवनांत एक नवी गोडी मिळते. तीच हेतु मनांत ठेऊन ते बाबांजवळ आले आहेत. बाबांच्या जवळ आल्याने ते स्वतः तर आनंदात आहेतच, परंतु त्यांना पाहून बाबांना देखील आनंद झाला आहे. त्यांस लिहून दिले, "तुम्ही येथे पांच, सहा दिवस अवश्य राहा. श्रम करा. ध्यान करा. मित्रांशी-चर्चा करा. हे तुमचेच घर आहे."

१८-११-६४

सकाळी ब्रम्हसूत्रांचा वर्ग संपल्या-बरोबर बातमी कळली की 'बाबा शेतात विहीर खोदण्यास जात आहेत.' आश्रमा-च्या बाजूलाच शेती आहे. आश्रमवासीच तेथें काम करतात. गोटाड जमीन संपल्यानंतर जेथे झाडांची सुरुवात होते ते ठिकाण निवडले गेले आहे. बाबांनी लिहून दिले, "माझ्या हातून तिचे उद्-घाटन होईल. पण मी फार काम करणार नाही. देखरेख मात्र ठेवीन." नंतर विहीर खोदण्याचे फायदे लिहून दिले.

१. बेकारांना काम.
२. खोदण्याचा आनंद.
३. नशिबाची परीक्षा.
४. पाण्याचा मोठा झरा लागला तर शेती.
५ नुसताच पाझर लागल्यास पिण्यास गोडे पाणी.

सर्व बंधू-भगिनी तेथें जाऊन पोंचले, खुदाई सुरू झाली. खोदणारे खोदत होते. इतर लोक रांगेत उभे राहिले व मातीने भरलेल्या टोपल्या चेंडू सारख्या एकमेकाकडे फेकू लागले. काम व खेळ दोन्ही बरोबरच चालू होते.

२१-११-६४

काल बाबांना पुन्हा भोंवळ आली. बाकी तब्येत ठीक आहे. विहीर खोद-ण्याचे काम पाहावयास येत असतात. स्वतःही थोडेसे काम करू लागतात. आज आश्रमांत परत येऊन एक आठवडा झाला. मधून मधून थोडेसे बोलतात. आश्रमवासीयांशी बोलणे झाले. काही पत्रेंहि लिहविली.

आज पॅरिसवरून कांही लोक बाबांची टेलिव्हिजन फिल्म घ्यावयास आले होते. त्यांचा आवाजहि रेकॉर्ड करण्याची त्यांची इच्छा होती. त्यांस उद्या सकाळी नऊ वाजतांची वेळ बाबांनी दिली आहे. बाबांनी आम्हांस लिहून दिले, "हे लोक फ्रांसवरून सरळ मजकडे आले. ईश्वरच माझा प्रचार करीत आहे. मी मागे म्हटले होते की या टेलि-व्हिजनच्या युगात मला युरोप आदिची यात्रा करण्याची मुळींच जरूरी नाही.

देव करी तरी काय न होई ।
दगडाचेनि नई तरियेले ॥"

आज बाबांच्याकडे एक पुस्तक आले. त्याच्यावरील रॅपर कुणीतरी काढून टाकले होते म्हणून ते कोणाकडून आले हे समजणे कठिण होऊन बसले. पुस्तकाची लिपि रोमन होती, परंतु भाषा कोणची हे समजू शकले नाही. रोमन लिपि असल्यामुळे काही शब्द-वाचता आले. पुस्तकाचे नांव होते 'भगवद्गीता'. लेखकाचे नाव होते. 'आचार्य विनोबा भावे.' प्रस्तावनेखाली नांव होते, 'जयप्रकाश नारायण.' इतक्या बाबींचा तर बोध झाला. परंतु पुस्तकाची भाषा कोणची ? बाबांना फ्रेंच, जर्मन, एस्परेंटो वगैरे भाषा येतात, परंतु या पुस्तकाची भाषा त्यांना परि-चित नव्हती. अनेक कल्पना लढविल्या गेल्या, परंतु भाषेचा उलगडा झाला नाही. शेवटी पॅरिस वरून आलेल्या मित्रांना विचारले. त्यांनी सांगितले की ही डॅनिष भाषा आहे. ज्या भाषेची तोंड ओळख देखील नव्हती तींत भगवतद्गीतेचा अनुवाद झाला होता ! पॅरिसवरून टेलि-व्हिजनवाले येतात व डेन्मार्क वरून भगवद्गीतेचे डॅनिश भाषांतर !

'देव करी तरी काय न होई'।

विहीर खोदण्याचे काम जोरांत चालू आहे. सकाळ, संध्याकाळ काम करण्यास टोळ्या जात असतात. बाबांनी या विहिरीला नांव दिले आहे, 'कारूण्य-कूप;' व लिहिले, 'प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतात 'कारूण्य-कूप' असलाच पाहिजे.

संध्याकाळी ६ वाजता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक भेटण्यास आले होते. त्यांनी बाबांच्या प्रकृतीविषयी चिंता व्यक्त केली व त्यांस मुंबईस येण्याचे निमंत्रण दिले. बाबांनी लिहिले, "सध्यां येथें मी स्थिर झालो आहे. प्रकृति चांगली झाल्यानंतर विचार करूं. तुमच्या भेटीने मला फार आनंद झाला. मी तुमचा प्रजाजन आहे. माझा योग्य तो उपयोग तुम्ही करून घेऊ शकता. तुमचा तो अधिकार आहे." मुख्य मंत्री म्हणाले, "श्री. लालबहादुर शास्त्री यांनी मला सांगितले आहे की तुमच्या प्रकृती-बद्दल मी उत्तमांतला उत्तम डॉक्टरी सल्ला घ्यावा." बाबांनी लिहून दिले, "मद्रासचे तज्ञ डॉक्टर येऊन गेलेच आहेत. आता चिंता करण्याचे प्रयोजन नाहीं. श्री. शास्त्रीजी फाजील चिंता बाळगतात. त्यांना माझा नमस्कार सांगा."

—कालिंदी

---०---

www.vinoba.in

